# ग्रामीण महिला शिक्षण

**प्रा. प्रदिप माधवराव एडके**

**सरस्वती अध्यापक महाविद्यालय,किनवट**

**ता.किनवट जि.नांदेड**

भारतीय शिक्षणाचा विचार केला असता पुरुष व स्त्री शिक्षणाचा म्हणजेच सहशिक्षण प्रणालीचा विचार समोर येतो. सद्याच्या धकाधकीच्या युगात शिक्षण ही काळाची गरज बनली आहे. त्यातही कुटुंबात शिक्षित लोक असतील तरच समाजात अशा कुटुंबाना मानाचे स्थान मिळतांना दिसते म्हणून मानवी मुलभूत गरजात भर पडून अन्न, वस्त्र, निवारा या बरोबरच आरोग्य आणि शिक्षण यांचा समावेश झालेला असल्याने अलिकडील काळात दिसून येते. पुरूषप्रधान संस्कृतीत महिलांच्या शिक्षणाचा प्रश्न आजही २१ व्या शतकात सुद्धा महत्वाचा वाटतो आहे. शहरी भागांचा विचार करता स्थिती जरी बरी वाटत असली तरी ग्रामीण भागाचा विचार केल्यास महिलांच्या शिक्षणाची स्थिती गंभीर स्वरूपाची असल्याचे निदर्शनास येते असेच म्हणावे लागेल कारण ग्रामीण भागात आजही महिलांना चुल आणि मुल यांच्या आवती-भोवती गुरफटून ठेवल्याचे चित्र ग्रामीण भागात स्पष्टपणे दिसुन येते. पितृसत्ताक कुटूंब पद्धतीमुळे ग्रामीण भागातील पालकांची मुलींच्या शिक्षणाबद्दल उदासिनता स्पष्टपणे जानवतांना दिसते.

□ ग्रामीण महिलांच्या शिक्षणाची ऐतिहासिक पाश्र्वभूमी :-

भारताला स्वातंत्र्य मिळण्याअगोदर भारतीय महिलांसाठी शिक्षण घेणे म्हणजे तारेवरची कसरत ठरत असे त्यातही ग्रामीण मुलींना शिक्षणाची दारे बंदच होती. "ज्या देशात स्त्रिया सुशिक्षित व सुचरित असतील अशा स्रियांच्या पोटी देशाला ललामभूत ठरणारी नररत्ने जन्मास येतील."१ या लोभापोटी तरी स्त्री ला शिकवावे अशी विनवनी अनेक समाजसुधारकांनी त्या काळी केली पण तरीही 'स्त्री' शिक्षणाला ग्रामीण भागात चालना मिळालीच नाही असे म्हणावे लागेल. अशा निराशावादी काळात सुद्धा अनेक प्रयत्नाने सामाजिक सुधारणा करण्याच्या उद्देशाने ग्रामीण भागात शिक्षणाच्या संदर्भात जागृती करण्याचे कार्य करण्यात आले. महात्मा फुले यांनी १८४८ साली मुलींच्या शिक्षणाची जबाबादारी घेऊन शाळा सुरू केल्या व तत्कालीन सरकारला सुद्धा 'स्त्री' शिक्षणावर भर देण्यास भाग पाडले पण ग्रामीण भागात त्याचाही हवा तसा प्रचार झाला नाही. राष्ट्रसंत तुकडोजी महाराज यांनी ग्रामगीतेतील 'महिलोन्नती' या विसाव्या अध्यायात ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण होय असे प्रतिपादन केले आहे. "ग्रामोन्नतीचा पाया शिक्षण, उद्याचे राष्ट्र आजचे संतान यासाठी आदर्श पाहिजेत गुरूजन, राष्ट्र निर्माते"२ यातून तुकडोजी महाराजांनी ग्रामीण भागातील शिक्षण संदर्भात आपले मत मांडले आहे. खज्या अर्थाने राष्ट्राचा विकास करायचा असेल तर ग्रामीण भागातील शिक्षणाकडे लक्ष दिले पाहिजे.

□ ग्रामीण महिला शिक्षणाची सद्यस्थिती :-

भारताला स्वातंत्र्य मिळाल्यानतंतर ते आजच्या २१ व्या शतकापर्यंत अनेक सुधारणा भारतीय महिला शिक्षणाच्या संदर्भात झाल्याचे दिसते पण ग्रामीण भागातील 'स्त्री' शिक्षणाची आज सुद्धा स्थिती शहरी भागातील 'स्त्री' शिक्षणाच्या बरोबरीने नाही हे अभ्यासाअंती सिद्ध होते. सामाजिक, आर्थिक, राजकीय स्वातंत्र्य आजही ग्रामीण महिलांना मिळाले नाही हे काही भागातील स्त्री यांच्या विकासाचा अभ्यास केल्याने दिसून येते. "१९८४ मध्ये प्रसिद्ध झालेल्या रिपोर्ट प्रमाणे भारतात ग्रामीण भागात ६०% मुले प्राथमिक शाळेत प्रवेश घेतात, पण पाच वर्षानंतर फक्त १६% मुली तर ३५% मुले शाळेत येत राहतात."३ अशी विचार करण्यासारखी बिकट स्थिती 'स्त्री' शिक्षणाची आहे असे म्हणावे लागेल. मुलांच्या शिक्षणाच्या प्रमाणात मुलींचे शिक्षण हे ५०% पेक्षा ही कमी आहे.

ग्रामीण भागात 'स्त्री' शिक्षणाकडे पाहण्याचा दृष्टीकोन आजही चुकीचा असल्याचे दिसुन येते म्हणुनच भारतीय संविधानात सुद्धा संविधान निर्मात्यांनी 'स्त्री पुरूष' समानता हे तत्व अवलंबून

पुरूषाप्रमाणे स्रियांना सुद्धा शिक्षणाचा हक्क बहाल केला आहे व वय वर्ष ६ ते १४ या वयोगटातील प्रत्येक मुला-मुलींना मोफत व सक्तीचे शिक्षण देण्याची व्यवस्था केली तरी पण ग्रामीण भागात महीलांना शिक्षणाची जागृती झाल्याचे दिसत नाही. म्हणून राष्ट्रीय शौक्षणिक धोरण (१९८६) मध्ये "स्रियांचा दर्जा' उंचावण्याचे एक प्रमुख साधन म्हणून शिक्षण काम करेल अशी स्पष्ट ग्वाही या धोरणांतर्गत दिली आहे"४ यातून समाजात स्रियांना समान वागणुक दिली जाईल अशी व्यवस्था निर्माण करून ग्रामीण महिलेला अंधश्रद्धा, रूढी, परंपरा इ. बंधनातून मुक्त करण्याचा प्रयत्न केला गेला आहे. यावरून असे लक्षात येते की स्वतंत्र भारतात सुद्धा ग्रामीण भागातील महिलांच्या डोक्यातील परंपरावादी अंधश्रद्धेचे भुत उतरलेले नाही व पुरूषी रूबाब संपलेला नाही त्यामुळे ग्रामीण भागातील महिलांच्या शिक्षणाची स्थिती बिकटच बनुन राहिली आहे.

□ ग्रामीण महिलांच्या शिक्षणातील समस्या :-

शिक्षणाच्या प्रवाहात मुलींना आनतांना मुलींच्या पालकांना 'मुलगी ही परक्या घरचे धन आहे' ही मानसिकता निर्माण झाल्यामुळे मुलींच्या शिक्षणात अनेक समस्या निर्माण होताना दिसतात. " स्वातंत्र्योत्तर काळात नागरी भागातील मुलींना शिक्षणाच्या भरपुर सोयी, सुविधा उपलब्ध होत असल्याने त्यांच्या संर्वागीण विकासाची एक मुलभूत व्यवस्था तयार होते, तसे ग्रामीण मुलींच्या बाबतीत घडत नाही, शिवाय समाजाचा विरोध त्यामुळे त्या अडचणी राहिल्या."५ या दोन्ही समस्या गंभीर आहेत. पहिले तर ग्रामीण भागातील समाजाचा विचार करावा लागेल व सुधारणा कराव्या लागतील आणि नंतर शासकिय सोयी सुविधांंची पुर्तता करावी लागेल.

ग्रामीण भागातील वेगवेगळ्या समाजाचा विचार केला असता मुलींच्या शिक्षणाकडे पाहण्याचा वेगवेगळा दृष्टीकोण दिसून येतो. "मुलगी जन्मताच मारून टाकण्याची प्रथा पूर्वी या जमातीत होती, सरकारी दडपणामुळे व कायद्यामुळे ही प्रथा संपुष्टात आलेली आहे."६ अशी स्थिती ग्रामीण बंजारा समाजाची होती तर आदिवासी समाजातील पुरूषाला आजही शिक्षण मिळत नाही तर स्त्रीचा विचार दुरच. अशा बिकट समस्या ग्रामीण भागात आढळून येतात. दारीज्द्य, अज्ञान, जातिव्यवस्था, सामाजिक रूढींचा पगडा, अंधश्रद्धा, इ. गंभीर स्वरूपाच्या समस्या आजही ग्रामीण भागात महिलांच्या शिक्षणाच्या संदर्भात आहेत आणि त्या सोडविण्यासाठी ग्रामीण भागात जागृती करणे काळाची गरज बनत चालली आहे.

□ ग्रामीण महिलांच्या शिक्षणात समस्या / अडचणी निर्माण होण्याची कारणे :-

इसवी सन २००० साली 'स्रियांसमोरील आव्हाने' या संयुक्त राष्ट्र संघाने काढलेल्या रिपोर्ट प्रमाणे "ग्रामीण समाज त्यांच्या जीवनात पूर्णपणे स्त्रीयांवर अवलंबून असतो, तरी तो स्त्रीला शिक्षण देण्यास विरोध करतो"७ हीच प्रमुख अडचण ग्रामीण 'स्त्री' च्या शिक्षणात निर्माण झाली आहे. अशा अनेक कारणामुळे ग्रामीण 'स्त्री' आजही 'चुल व मुल' या कुळचटलेल्या विचारांतून बाहेर पडलेली नाही.

१) समाजाचा स्रियांकडे पाहण्याचा दुषीत दृष्टीकोण.

२) लिंगभावामध्ये अडकलेला ग्रामीण समाज.

३) लहान वयात होणाज्या विवाह बंधनामुळे स्त्री शिक्षणाकडे दुर्लक्ष.

४) ग्रामीण भागात 'स्त्री' शिक्षिकेचा तुटवडा.

५) समाजात अफाट पसरलेली अंधश्रद्धा.

६) मुली ह्या परक्या घरचे धन असते त्यांना शिक्षण देणे काही कामाचे नाही असा विचार.

७) शाळेतील गळतीची समस्या (शाळा सोडून देणे)

८) कौटुंबिक जबाबदारी मुलींवर टाकून पालक कामानिमित्त बाहेर जाणे.

९) कुटूंबातील दारिद्य स्थिती.

१०) पुरूषप्रधान संस्कृती.

११) ग्रामीण भागात मुलींच्या शिक्षणाप्रती उदासिनता.

१२) मुलगा हाच 'वंशाचा दिवा' असल्याचा समज

१३) कुटुंबाचे स्थलांतर.

वरील कारणांमुळे आजसुद्धा आपल्या देशात मुलींच्या शिक्षणाकडे दुर्लक्ष केले जाते असे म्हणावे लागेल "एका बाजुला मुली शिकून आकाशाला गवसणी घालतात तर दुसऱ्या बाजुला काही मुलींना प्राथमिक शिक्षण घेणे कठीण होते."८ अशी अवस्था शहरी भागातील मुलींची व ग्रामीण भागातील मुलींची शिक्षणा संदर्भात तुलना करताना दिसून येते.

□ उपाययोजना :-

ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणा संदर्भात अनेक समस्या जरी असल्या तरी त्या सर्व समस्या शासन, समाज आणि इतर घटकांनी आपापल्या पद्धतीने सोडविण्यासाठी कसोशीने प्रयत्न करणे गरजेचे आहे जसे की, "क्षमेने क्रोधाला जिंकावे, दुर्जनाला साधुत्वाने जिंकावे, कृपणाला दानाने जिंकावे व सत्याने लबाडाला जिंकावे"९ या विचाराप्रमाणे प्रत्येकानी या समस्यांवर उपाययोजना तयार करून ग्रामीण महिलांची स्थिती शहरी महिलांच्या बरोबरीने आणावी लागेल. त्यासाठी पुढीलप्रमाणे उपाय सांगता येतात.

१) ग्रामीण भागात स्त्री शिक्षणाची जागृती करावी लागेल.

२) शासकीय योजनांची माहिती, लाभ, मदत करावी.

३) मातृसत्ताक कुटूंब पद्धतीचा स्विकार करावा.

४) मुलगा व मुलगी समान आहेत याची जाणीव करून द्यावी.

५) ग्रामीण भागातील शाळांत महिला शिक्षिका उपलब्ध करून द्याव्यात.

६) मुलींना उच्च शिक्षणापर्यंत मोफत व सक्तीचे शिक्षण मिळवून द्यावे.

७) अधंश्रद्धा दुर करण्यासाठी सामाजिक उपक्रम राबवावे.

८) प्रत्येक समाजात शिक्षणासाठी जागृती करावी.

९) दुर्गाबाई देशमुख समितीच्या शिफारशींची अंमलबजावणी करावी.

१०) सहशिक्षणासंबंधी वातावरण निर्मिती करावी.

११) मुलींच्या पालकांचा उदासिन दृष्टीकोन दुर करण्यासाठी त्यांना प्रोत्साहन द्यावे.

१२) मुलामुलींचा भेदभाव न करता मुलींना समान वागणूक द्यावी.

१३) शासकीय स्तरावरून मुलींना सुरक्षा पुरवावी.

१४) ग्रामीण भागात माध्यमिक उच्च शिक्षणाची सोय करावी.

अगदी प्रगत काळात सुद्धा "ग्रामीण भागातील मुलींच्या वाटेला जन्मत: दोन भाग येतात, एक म्हणजे पितृप्रधान संस्कृती असलेल्या कुटुंबात जन्म व दुसरा जगण्यास अपात्र करणारा परिसर"१० या दोन भोगातून जर 'स्त्री' मुक्त झाली तर नक्कीच ग्रामीण महिला शिक्षणाला नवसंजीवनी लाभेल यात शंकाच नाही.

□ समारोप :-

भारतीय समाजात पुरूष प्रधान कुटुंब पद्धतीमुळे धार्मिक, सामाजिक बंधनात स्त्रीला बांधून ठेवण्याची मानसिकता पूर्वीपासून चालतच आलेली आहे आणि आज सुद्धा त्यात

सुधारणा होण्यास तयार नाही. ग्रामीण भागातील महिला आजही जपुन, साजुक, नाजुक जीवन जगतांना दिसतात व 'स्त्री' ला भयभीत करणारे वातावरण निर्माण करण्याचा प्रयत्न केला जातो पण कौटुंबिक व सामाजिक स्तरावर यात सुधारणा होणे काळाची गरज आहे. ते केवळ शिक्षणामुळे होऊ शकते. सामाजिक जागृतीमध्ये समाजहीत जोपासतांना सामाजिक जाणीव करून द्यावी लागेल. "कोणत्याही समाजाची सांस्कृतिक व अध्यात्मिक पातळी त्या समाजातील स्त्रियांचे स्थान काय यावरून ओळखता येते."११ हे समाजवून सांगावे लागेल व एक प्रकारे शिक्षण घेणे महत्त्वाचे आहे त्यासाठी शासकीय स्तरावरून 'सक्ती' करावी लागेल तरच ग्रामीण भागातील मुलींच्या शिक्षणाची स्थिती सुधारेल व राष्ट्रउन्नतीकारक कृती घडतांना दिसेल यासाठी अनेक सामाजिक, राजकीय, धार्मिक संस्थांनी आपापल्या पद्धतीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. त्यासाठी जनजागृती करणे गरजेचे आहे नाही तर देशाचे नुकसान सहन करून घेण्यास तयार रहावे लागेल त्यास जबाबदार बनावे लागेल.

□ संदर्भ सूची :-

१) डॉ.संघमित्रा गोणारकर, शैक्षणिक विचारवंत, निर्मला प्रकाशन, नांदेड पृ.क्र. ५२.

२) प्रा.ना.ग.पवार, शिक्षण क्षेत्रातील विचारवंत, नित्य नूतन प्रकाशन, पुणे,२००५-०७, पृ.क्र. ७९

३) डॉ. शैलजा भंगाळे, प्रा.डॉ. रंजना सोनवणे, लिंगभाव, शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१६, पृ.क्र. ३१

४) डॉ. बी.पी. मरजे, डॉ.युवराज पवार, लिंगभाव, शाळा आणि समाज प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, पृ.क्र. ६४

५) डॉ. शैलजा भंगाळे, प्रा.डॉ. रंजना सोनवणे, लिंगभाव, शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१६, पृ.क्र. २९

६) डॉ.ज्योती लांजेवार, फुले-आंबेडकर आणि स्त्री-मुक्ती चळवळ, संकेत प्रकाशन, नागपूर, २०१६, पृ.क्र. ८९

७) डॉ. शैलजा भंगाळे, प्रा.डॉ. रंजना सोनवणे, लिंगभाव, शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१६, पृ.क्र. ३१

८) डॉ. शैलजा भंगाळे, प्रा.डॉ. रंजना सोनवणे, लिंगभाव, शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१६, पृ.क्र. ३३

९) डॉ.धनराज अहाट, धम्म नायिका, संकेत प्रकाशन, नागपूर, २०१६, पृ.क्र. ८४

१०) डॉ. शैलजा भंगाळे, प्रा.डॉ. रंजना सोनवणे, लिंगभाव, शाळा आणि समाज, प्रशांत पब्लिकेशन्स, जळगाव, २०१६, पृ.क्र. ३२

११) डॉ.संघमित्रा गोणारकर, शैक्षणिक विचारवंत, निर्मला प्रकाशन, नांदेड पृ.क्र. ५३.